# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१३ – १४

### विश्वशांती यात्रा

सकाळ
मंगळवार,
७ जानेवारी २०१४
४

# महाभिक्खूंचे राजगुरुनगरमध्ये स्वागत



**राजगुरुनगर (ता. खेड) : डॉ. आंबेडकर स्मारक समितीच्या पदाधिकाऱ्यांसमवेत थायलंड येथून आलेले बौद्धधर्मीय महाभिक्खू.**

**राजगुरुनगर, ता. ६ :** थायलंडमधून आलेल्या २०० बौद्ध भिक्खूंच्या विश्वशांती पदयात्रेचे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव समितीने स्वागत केले व दानही दिले.

थायलंडचे महाभिक्खू लिम्फो पायरीन आणि नालासोपारा बुद्धविहारातील उपासक कीर्तीपियो नागसेन यांच्या मार्गदर्शनाखाली या यात्रेत थायलंड देशातील १२० बौद्ध भिक्खू, २० साधिका, ६० पुरुष महिला उपासक आणि भारतातील ५० बौद्ध उपासक सहभागी झाले आहेत. भारतात बौद्ध धर्माचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी थायलंडमधील बौद्ध महाभिक्खू, लुम्फो सनोंग यांच्या नेतृत्वाखाली विश्वशांती पदयात्रा पाच वर्षांपासून काढण्यात येते. बौद्ध महाभिक्खू, लुम्फो सनोंग यांचे नुकतेच निधन झाले. त्यांचे कार्य पुढे सुरू राहावे म्हणून लुम्फो पायरीन यांच्या नेतृत्वाखाली विश्वशांती पदयात्रा भारतातून काढली जाते. एकूण ४५ दिवस पदयात्रा सुरू राहणार आहे. मुंबईच्या नालासोपारा येथून २४ डिसेंबरला ही पदयात्रा सुरू झाली असून, बुद्धगया येथे ३ फेब्रुवारीला सांगता होईल. नागपूर व औरंगाबाद येथे तीनदिवसीय धम्मशिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या यात्रेचे स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, समितीचे अध्यक्ष विलास गायकवाड, सचिव प्रभाकर पवार, किसान सभेचे जिल्हाध्यक्ष महेंद्र थोरात, पत्रकार संघाचे उपाध्यक्ष रामचंद्र सोनवणे यांनी केले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख